MHNS180015392025

सं.फौ.ख.क्र.८३३/२०२५
सरकार वि. ज्ञानेश्वर बाजीराव पवार
**नि. क्र.०९ लगत.**

# न्यायनिर्णय

(दिनांक १०/०३/२०२६ रोजी घोषित)

खालील मुद्दे माझ्यासमोर उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि.२७.०९.२०२५ रोजी नेपाळी चौक ता.देवळा येथे आरोपीच्या ताब्यात देशी दारुच्या एकुण ३७ सिलबंद बाटल्या बेकायदेशिर व अवैधरित्या मिळुन आल्या ? | ... नाही |
| ०२. | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०२. आरोपी वरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एक पंच साक्षीदार रोहीत जिभाऊ बोरसे सा.क्र.०१ याची साक्ष नोंदविली. खटला चालवित असतांना आरोपीविरुध्द गुन्ह्यासंदर्भात काही विधाने आलेली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. ०१ व ०२ करीता**

०३. आरोपी वरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने वर नमुद साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. पंच सा.क्र.०१ याने पुराव्यात, दिनांक २७.०९.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला पंचनाम्याकरीता कोठेही बोलाविले नव्हते असे नमुद केले. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत साक्षीदाराला सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्याने अभियोग पक्षाचे कथन पुर्णपणे नाकारले. त्यामुळे पंच साक्षीदारांसमक्ष जप्ती वजा घटनास्थळ पंचनामा करण्यात आला व आरोपीच्या ताब्यातुन देशी दारुच्या ३७ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या, ही बाब संशयापलीकडे शाबीत होत नाही. त्यामुळे सदर पंच साक्षीदाराचा पुरावा पंचनामा शाबीत करण्यांस पुरेसा नाही.

०४. सदर प्रकरणात रासायनिक विष्लेषणाचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेली दारु व रासायनिक विश्लेषणासाठी पाठविलेला दारुचा नमुना हा एकच मुद्येमाल होता ही बाब शाबीत होत नाही. जप्ती पंच फितुर झाल्यामुळे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. जप्त केलेला मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुनच जप्त केला होता याबाबत शंका व्यक्त होते. त्यामुळे आरोपी विरुध्द सदर गुन्हा शाबीत झालेला नाही. करीता मी, मुद्दा क्र.०१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.०२ च्या निष्कर्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी **ज्ञानेश्वर बाजीराव पवार** याची मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) च्या दंडनिय अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचा बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

०३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल देशी दारु अपिलाचा कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात यावा.

०४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ ची पुर्तता केली आहे.

०५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.

MEGHARAJ VAMANRAO JAWALE

Digitally signed by MEGHARAJ VAMANRAO JAWALE
Date: 2026.03.10 14:54:54 +0530

(एम.व्ही. जावळे)

दि.१०/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळवण.